नि. फौ. ख. क्र. **२१४/२०२४**
सरकार विरूद्ध वैभव
**निशाणी १६**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : मंगेश प्रकाश सोनवणे,
वय : ३९ वर्षे,
धंदा : व्यापार,
राहणार : चोहोट्टा बाजार, ता. आकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

दि. १०/०५/२०२४ रोजी पोलीसांनी मला चोहोट्टा बाजार पोलीस स्टेशनला बोलवले होते. पोलीसांनी माझेसमक्ष कुठलाही पंचनामा किंवा कारवाई केली नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर अनुक्र. १ वर माझी सही आहे. मला त्यातील मजकुर माहिती नाही. दि. २५/०५/२०२४ रोजी पोलीसांनी मला बोलवले नव्हते. आता मला जप्ती पंचनामा दाखवला. माझेसमक्ष कोणतीही जप्ती झाली नाही. त्यावर अनुक्र. १ वर माझी सही आहे. मला त्यातील मजकुर देखील माहिती नाही.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली)***

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. १०/०५/२०२४ रोजी पोलीसांनी मला चोहोट्टा बाजार येथील थोरात यांच्या चहाच्या हॉटेलजवळ घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलवले होते व त्याठिकाणी पोलीसांनी माझेसमक्ष घटनास्थळाचा

सविस्तर पंचनामा तयार केला व तो वाचुन त्यावर मी घ
ाटनास्थळी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. २५/०५/२०२४ रोजी पोलीसांनी मला चोहोट्टा बाजार पोलीस ठाण्यात जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलवले होते व त्याठिकाणी पोलीसांनी माझेसमक्ष आरोपीच्या ताब्यातुन एक स्टीलची तवेली जप्त केली व त्याबाबत सविस्तर पंचनामा तयार केला व तो वाचुन त्यावर मी पोलीस ठाण्यातच त्यावर सही केली होती.

३. मी इयत्ता बारावी शिकलो असुन, मला लिहिता—वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, कुठलाही दस्त वाचुन समजुन घेतल्याशिवाय मी त्यावर सही करत नाही. मी आरोपींना ओळखत नाही. मी आरोपीला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपीतर्फे ॲड. श्री. एस. एन. तराळे यांचे मार्फत नाकारण्यात आली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. २४.०६.२०२६
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.